दैनिक www.esuryodaylive.com Email : suryodaykokan.123@gmail.com

महाराष्ट्र

# सूर्योदय

मुख्य संपादक : गंगाधर काळकुटे

भरत सरपरे (संपादक कोकण आवृत्ती)




कोकण || वर्ष ६ वे || अंक ३६ || रविवार ०१ फेब्रुवारी २०२६ || RNI No.MAHMAR/2014/54581 || Postal Regd No.L/74/RNP/Beed/2019-21 || पाने ४ किंमत २ रुपये ||

## ६९ व्या राष्ट्रीय कराटे स्पर्धेत म्हसळ्याचा सोहेल तांबे ची सूवर्ण कामगिरी : ६६ किलो वजनी गटात सुवर्ण पदकाचा ठरला मानकरी

द. रा. जि. उपसंपादक : संतोष उद्धरकर

म्हसळा: दि. २७ जाने रोजी बारामती येथे ६९ व्या राष्ट्रीय कराटे स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते, स्कुल गेम ऑफ इंडीया यांच्या मार्फत महाराष्ट्र बारामती येथे सदर खेळाचे आयोजन करून या राष्ट्रीय कराटे स्पर्धेत महाराष्ट्र, गुजरात, गोवा, पंजाब, आंध्रप्रदेश, राजस्थान, बिहार, तामिळणाडु, केरळ, ओडिसा, दिल्ली, अशा विविध राज्यातील स्पर्धकांनी सहभाग नोदविला होता. या मध्ये म्हसळा चॅम्पियन कराटे क्लबचा विद्यार्थी कु. सोहेल शाशिकांत तांबे रा. म्हसळा, सुरई याने ६६ किलो वजनी गटात सुवर्ण पदक मिळवुन सूवर्ण कामगिरी करून आपल्या शाळेचे, गावाचे, म्हसळा तालुक्याचे, आईवडिलांचे तसेच चॅम्पियन कराटे क्लबचे नाव मोठे केले आहे, सोहेल तांबे हा राष्ट्रीय कराटे स्पर्धेत सुवर्ण पदक मिळवणारा म्हसळा तालुक्याचा पहिला खेळाडू ठरला असुन त्यांचे सर्व स्तरातुन कौतुक होत असून त्याच्या या यशामागे चॅम्पियन क्लबचे सिहान संतोष मोहिते व प्रशिक्षक सेन्सई अविनाश मोरे तसेच मार्गदर्शक अभय कलमकर यांचे मोलाचे सहकार्य लाभले, तसेच महाराष्ट्र अध्यक्ष सलाऊद्दीन अन्सारी, जनरल सेक्रेटरी संदीप गाडे यांचे देखील मोलाचे सहकार्य लाभले आहे, सोहले तांबे याने सुवर्ण पदक मिळवुन तालुक्याचे नाव मोठे केले असल्याने शिवसेना तालुका प्रमुख बाबु बनकर, अकमल कादिरी, मनोहर तांबे, उषा एलवे, विशाल सायकर, म्हसळा एस. टी. वाहतुक अधिकारी उदय मोरे, निलेश मांदाडकर या सर्वांनी सोहेलचे पुष्पगुच्छ देऊन अभिनंदन केले व पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा देण्यात आल्या








## पांगलोली जिल्हापरिषद गटात शिवसेना गटाची प्रचारात आघाडी

द. रा. जि. उपसंपादक: संतोष उध्दरकर

म्हसळा:आगामी जिल्हापरिषद निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर ङ्गपांगलोली जिल्हा परिषद गटात शिवसेनेच्या जिल्हा परिषदेचे उमेदवार प्रसाद बोर्ले, पांगलोली पंचायत समिती गणातील उमेदवार पाटेकर, साळवींडे पंचायत समिती गणातील अमोल पेंढारी यांनी प्रचारात आघाडी घेत मतदारांशी संवाद साधला. गटातील आणि पंचायत समिती गणांतील मुलभूत सुविधांसाठी आश्वास्त केले. शिवसेनेचे सर्व उमेदवार हे गट आणि गणातील मतदारांशी कटिबद्ध असल्याचे उमेदवार प्रसाद बोर्ले यांनी सांगितले. पांगलोली जिल्हा परिषद गटात चौरंगी लढत होत असून यात शिवसेनेच्या उमेदवार हे कडवी लढ़त देत असून त्यांनी राष्ट्रवादी काँग्रेसच्या उमेदवारांपुढे आव्हान उभे केले आहे.प्रसाद बोर्ले आणी पंचायत समितीचे उमेदवार सध्या दररोज विविध गावांना भेटी देत नागरिकांशी थेट संवाद साधत आहेत. मतदारसंघातील साळवींडे गणातील गावात त्यांचा प्राथमिक भेटी पुर्ण झाल्या. येथील विकासकामे, मूलभूत सुविधा, पाणी, रस्ते, आरोग्य व शिक्षण यासंदर्भातील समस्या ऐकून घेऊन त्या सौडविण्यासाठी कटिबद्ध असल्याचे आश्वासन ते देत आहेत.





गावभेटी दरम्यान शिवसेनेचे पदाधिकारी, कार्यकर्ते तसेच स्थानिक ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित राहत आहेत. पांगलोली जिल्हापरिषद मतदारसंघात प्रचाराचा वेग वाढत असताना प्रसाद बोर्ले यांच्या गावभेट कार्यक्रमामुळे शिवसेनेची पकड अधिक मजबूत होत असल्याचे राजकीय वर्तुळात बोलले जात आहे.

## नद्यांचे पावित्र्य राखा.महानाद्यांची अवस्था केविलवाणी झाली आहे मानव स्वतः सहित जलसृष्टीच्या पायावर धोंडा मारून घेत आहे

डॉ. प्रशांत परांजपे:- महाराष्ट्रातील पवित्र नद्या मानल्या जाणाऱ्या इंद्रायणी आणि गोदावरी नद्या सांडपाणी, औद्योगिक कचरा आणि मानवी हस्तक्षेपामुळे अत्यंत प्रदूषित झाल्या आहेत. इंद्रायणीवर पांढरा फेस व जलपर्णी, तर गोदावरीत प्रक्रिया न केलेले सांडपाणी (८५%) व घातक घनकचऱ्यामुळे पर्यावरणास मोठा धोका निर्माण झाला आहे. नॅशनल ग्रीन ट्रिब्यूनल () ने या प्रकरणी कठोर कारवाईचे निर्देश दिले आहेत .



इंद्रायणी काठी प्रदूषणाचा वेढा....

पिंपरी-चिंचवड आणि आळंदी परिसरातील औद्योगिक वसाहतींमधून (, ) सोडलेले प्रक्रिया न केलेले सांडपाणी आणि रसायनयुक्त कचरा या मुख्य गोष्टी इंद्रायणी नदी प्रदूषित होण्यास कारणीभूत ठरल्या आहेत.ङ्ग परिणामी नदीच्या पात्रात मोठ्या प्रमाणात पांढरा फेस आणि जलपर्णी पसरली आहे, ज्यामुळे नदी मृतवत झाली आहे .ङ्ग ने स्थानिक स्वराज्य संस्थांना सुधारणा आराखडा सादर करण्याचे आदेश दिले आहेत.ङ्गगोदावरी नदी प्रदूषण (नाशिक)ङ्ग नाशिक शहरातील ८२% घरगुती सांडपाणी आणि १८% औद्योगिक कचरा थेट नदीत मिसळतो.ङ्गपरिणामी नदीपात्रात प्लास्टिक पिशव्या, खाद्यपदार्थ, आणि धार्मिक कचरा टाकल्यामुळे पाणी विषारी झाले आहे .ङ्ग नैसर्गिक शुद्धीकरणाची प्रक्रिया मंदावली आहे, ज्यामुळे मान्सून सोडून इतर काळात प्रदूषण अधिक वाढते .दोन्ही नद्यांच्या संवर्धनासाठी राज्य सरकारकडून उपाययोजना जाहीर झाल्या असल्या, तरी प्रत्यक्ष अंमलबजावणीची गती मंद आहे वाशिष्ठीचे जलजीवनही व्हेंटिलेटरवर कोकणातील महत्वाची वाशिष्ठी नदी देखील लोटे परशुराम एमआयडीसीतील कारखान्यांनी बेदरकारपणे सोडलेल्या सांडपाण्यामुळे प्रदूषित झाली आहे . तसेच नदी काठावरील आणि नदीतील सजीव सृष्टी धोक्यात आली आहे.ङ्ग मला काय त्याचे ही वृत्ती आणि निसर्ग आणि पर्यावरण संवर्धनाची शासन, प्रशासन आणि बहुसंख्य नागरिकांच्यामध्ये जाणीव जागृती नसणे. या मुळे आपल्या पायावर आपणच धोंडा मारून घेतला आहे ज्यामुळे पाय तुटला असूनही आम्ही कोणीच जागृत होत नाही. त्यामुळे विनाश अधिक वेगाने जवळ येतो आहे.



सूर्योदय
रविवार ०१ फेब्रुवारी २०२६

संपादकीय

## भयमुक्त परीक्षा

महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ पुणेमार्फत फेब्रुवारी–मार्च २०२६ मध्ये इयत्ता बारावी आणि इयत्ता दहावीची लेखी परीक्षा सुरू होत आहे. इयत्ता बारावीची लेखी परीक्षा १० फेब्रुवारी ते ११ मार्च २०२६ या दरम्यान तर इयत्ता दहावीची परीक्षा २० फेब्रुवारी ते १८ मार्च २०२६ या कालावधीत आयोजित करण्यात आली आहे. त्यामुळे कॉपीमुक्त अभियान राबविण्यासाठी शिक्षण मंडळाने संबंधित कनिष्ठ महाविद्यालयाचे प्राचार्य व माध्यमिक विद्यालयाचे मुख्याध्यापक यांना तशा सूचना दिलेल्या आहेत. तसेच दक्षता समिती व भरारी पथकांची नियुक्ती सुद्धा करण्यात आली आहे. असे असले तरी परीक्षेच्या कालावधीत विद्यार्थ्यांनी भयमुक्त वातावरणात परीक्षा देणे गरजेचे आहे. त्यासाठी परीक्षेला जाणाऱ्या विद्यार्थ्यांना प्रोत्साहन दिले पाहिजे. त्यांचा उत्साह वाढवायला हवा. ही आपली सर्वांची जबाबदारी आहे.

भयमुक्त म्हणजे विद्यार्थी आत्मविश्वासाने परीक्षेला सामोरे जातील. त्यासाठी विद्यार्थ्यांनी वर्षभरातील केलेला अभ्यास अतिशय महत्त्वाचा असणार आहे. ज्या विद्यार्थ्यांनी शाळेत नियमित जाऊन नियमितपणे अभ्यास केलेला असेल त्यांना परीक्षेचे भय वाटणार नाही. असे विद्यार्थी आनंदाने परीक्षेला सामोरे जातात. जे विद्यार्थी अभ्यासात चुकारपणा करतात असे विद्यार्थी जसजशी परीक्षेची तारीख जवळ येते तसतसे तणावाखाली येत असतात. त्यामुळे त्यांना परीक्षेला जाताना भय वाटत असते. याला कारणं सुद्धा अनेक असतील. मात्र विद्यार्थ्यांना आपले ध्येय गाठायचे असेल तर अभ्यास महत्त्वाचा असतो. शाळा सुरू झाल्यापासून विद्यालयामध्ये जसा अभ्यास शिकवून झालेला असेल त्याप्रमाणे वेळेचे नियोजन करून अभ्यास करावा. विद्यार्थ्यांनी अभ्यास एके अभ्यास जरी केला तरी आपण एक विद्यार्थी आहोत, आपल्यासाठी कोणीतरी परिश्रम करीत आहेत याची जाणीव विद्यार्थ्यांमध्ये निर्माण झाली पाहिजे. विद्यार्थीदशेत विद्यार्थ्यांचे विचार शिक्षणाशी निगडित असावेत. शिक्षणामुळेच आपण मोठे होऊ शकतो याची जाणीव त्यांच्यात निर्माण व्हायली हवी. महत्त्वाची बाब म्हणजे, विद्यार्थ्यांनी दररोज आपल्या आवडीचे वेळेवर जेवण घ्यावे. व्यायाम करावा, खेळ व पुरेशी झोप घ्यावी. मात्र अति विचार टाळावेत. अनाठायी वेळ वाया घालवू नये. त्यात मध्ये टी. व्ही.वरील कार्यक्रम व बातम्या पाहाव्यात यामुळे विद्यार्थ्यांच्या ज्ञानात अधिक भर पडत असते. असे नियमित करायला हवे. हीच खरी यशाची गुरुकिल्ली असते. परीक्षा काळात विद्यार्थ्यांनी मन शांत ठेवणे गरजेचे असते. मन शांत ठेवल्याने अभ्यासामध्ये मन रमते. याचा परिणाम विद्यार्थ्यांच्या मनातील परीक्षेची भीती आपोआप निघून जाते. खोडकर मित्रांचा नाद सोडून चांगल्या मित्रांच्या सहवासात राहावे. मोबाईलला चार हात दूर ठेवावे. आवश्यक कामासाठी मोबाईलचा वापर करावा. याचा परिणाम परीक्षेची तयारी झाल्याने विद्यार्थी हसत हसत आनंदाने परीक्षेला जातात. बरेच विद्यार्थी अभ्यासात चुकारपणा केल्याने परीक्षेच्या कालावधीत मानसिक तणावाखाली दिसतात. याचा परिणाम आपण काय करावे काय करू नये याचा विचार करीत विद्यार्थी असतात. अशावेळी त्यांच्या मनातील भीती घालविण्यासाठी किंवा परीक्षेच्या तयारीसाठी विद्यार्थ्याला तसेच त्यांच्या पालकांना समुपदेशन करणे गरजेचे आहे. परीक्षेपूर्वी प्रत्येक विद्यालयांनी किंवा एकत्रितपणे मानसोपचार तज्ज्ञांचे विद्यार्थ्यांसाठी मार्गदर्शन आयोजित करण्यात यावेत. यामुळे विद्यार्थ्यांच्या मनातील भीती दूर होते.

दहावी आणि बारावीच्या परीक्षा विद्यार्थ्यांच्या दृष्टीने अतिशय महत्त्वाच्या असतात. या दोन्ही परीक्षेमुळे विद्यार्थ्यांच्या करिअरची दिशा ठरत असते. त्यामुळे विद्यार्थ्यांना परीक्षेच्या भयातून मुक्त करायला हवे. हेच विद्यार्थी देशाचे सुजाण नागरिक बनणार आहेत. वर्ष, महिने आणि आता काही दिवस परीक्षेला शिल्लक राहिले आहेत. इयत्ता दहावी आणि बारावीच्या परीक्षेचे महत्त्व आजही कमी झालेले नाही. विद्यार्थ्यांची उच्च शिक्षणाची दिशा या परीक्षांवर अवलंबून असते. आता बारावीच्या परीक्षेला १० दिवस आणि दहावीच्या परीक्षेला २० दिवस आहेत. वर्षभर आपण काय केले? किती तास अभ्यास केला? मार्गदर्शक कोण होते? गंमती जंमती काय केल्या? हे सर्व बाजूला ठेवावे. विद्यार्थ्यांनी आपल्या भवितव्याचा विचार करून परीक्षेचे वेळापत्रक डोळ्यांसमोर ठेवून अभ्यासाची उजळणी करावी. त्याचप्रमाणे लिहिण्याचा सरावही नियमित करावा.

# कठीण प्रसंगी उपमुख्यमंत्री पदाची जबाबदारी सुनेत्रा पवार यांचे अभिनंदन डॉ. सुवर्णा कराड



महाराष्ट्राच्या राजकीय इतिहासात अलीकडील घडामोडींनी भावनिक आणि निर्णायक वळण घेतले आहे. वैयक्तिक दुःखाच्या पार्श्वभूमीवरही सार्वजनिक जबाबदारी स्वीकारत सुनेत्रा पवार यांनी महाराष्ट्राच्या पहिल्या महिला उपमुख्यमंत्री म्हणून पुढे येण्याचा निर्णय घेतला आहे. हा निर्णय केवळ राजकीयच नव्हे, तर सामाजिक आणि नैतिकदृष्ट्याही अत्यंत महत्त्वाचा आहे.ङ्गकठीण प्रसंगी पतींचे अपूर्ण राहिलेले कार्य आणि स्वप्न पूर्ण करण्याचा निर्धार करत सुनेत्रा पवार पुढे आल्या आहेत. संकटाच्या काळात त्यांनी दाखवलेले धैर्य, संयम आणि जबाबदारीची जाणीव महाराष्ट्रासाठी प्रेरणादायी ठरते.

या ऐतिहासिक निर्णयाचे स्वागत करत वंजारी महासंघ महिला आघाडी, महाराष्ट्र राज्याच्या प्रदेशाध्यक्ष डॉ. सुवर्णा कराड यांनी त्यांचे मनःपूर्वक अभिनंदन केले असून पुढील वाटचालीसाठी हार्दिक शुभेच्छा दिल्या आहेत.ङ्गडॉ. सुवर्णा कराड यांनी आपल्या प्रतिक्रियेत म्हटले आहे की, ''कठीण प्रसंगी जबाबदारी स्वीकारणे हे नेतृत्वाचे खरे लक्षण आहे. सुनेत्रा पवार स्वभावाने शांत असल्या, तरी निर्णयक्षमतेत कणखर असून त्या राज्यहितासाठी ठाम आणि दूरदृष्टीपूर्ण निर्णय घेतील, असा आम्हाला पूर्ण विश्वास आहे.''ङ्गत्यांनी पुढे स्पष्ट केले की, हा निर्णय महिलांसाठी प्रेरणादायी असून संवेदनशीलता आणि ठाम निर्णयक्षमता यांचा संगम नेतृत्वाला नवी दिशा देतो. राज्याच्या विकासासाठी आवश्यक ते कठोर पण लोकाभिमुख निर्णय त्या घेतील, अशी अपेक्षा आहे.ङ्गएकूणच, वैयक्तिक दुःखावर मात करून कर्तव्याशी निष्ठा राखत पुढे जाण्याचा सुनेत्रा पवार यांचा निर्धार महाराष्ट्राच्या सार्वजनिक जीवनात सकारात्मक आणि मार्गदर्शक उदाहरण ठरेल, असा विश्वास व्यक्त करण्यात येतो.

# विद्यार्थ्यांनी मतदानाबाबत आपल्या परिसरात जनजागृती करणे आवश्यक आहे नोडल अधिकारी सौ. कल्याणी मुळे : मंडणगडमध्ये विद्यार्थ्यांनी पथनाटयाच्या माध्यमातून केली मतदान जनजागृती मुंडे महाविद्यालयाच्या वतीने मतदाता जनजागृती अभियाना अंतर्गत 'मतदान जनजागृती पथनाटय'सादर

मंडणगड (प्रतिनिधी) दि. :येथील सावित्रीबाई फुले शिक्षण प्रसारक मंडळाच्या लोकनेते गोपीनाथजी मुंडे कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयतील एन. एस. एस. विभाग व महाराष्ट्र शासन स्वीप व्यवस्थापन कार्यक्रम तथा गटशिक्षणाधिकारी पंचायत समिती तहसील कार्यालय, निवडणूक विभाग मंडणगड यांच्या सहकार्याने मुंडे महाविद्यालयात व मंडणगड शहरामध्ये 'मतदान जनजागृती'अभियाना अंतर्गत 'मतदार जनजागृती पथनाटय' कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. पंचायत समितीच्या गटशिक्षणाधिकारी सौ. कल्याणी मुळे, महाविद्यालयाचे उपप्राचार्य डॉ. विष्णु जायभाये, प्रा. हनुमंत सुतार, डॉ.महेश कुलकर्णी, प्रा. अशोक कंठाळे, महाविद्यालयाचे ग्रंथपाल डॉ. दगडू जगताप, पंचायत समितीचे श्री. रेवाळे सर, प्राथमिक शिक्षक कुणाल आंधळगावकर, किशोर आंधळे, किशोर देवकर, बुधावले सर, रजपूत मॅडम, पदूमले सर, चाफळकर सर, आदी मान्यवर उपस्थित होते.ङ्गविद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना नोडल अधिकारी सौ. कल्याणी मुळे यांनी सांगितले की, दिवसेंदिवस कमी होत चाललेली मतदानाची टक्केवारी लक्षात घेऊन मतदानाचा पवित्र हक्क बजावण्याबाबत जनजागृती करणे गरजेचे बनले आहे. विद्यार्थ्यांनी मतदानाबाबत आपल्या परिसरात




जनजागृती करणे आवश्यक आहे. आपल्या देशात लोकशाही टिकवायची असेल तर एक चांगला व सक्षम उमेदवार निवडण्यासाठी आपल्या मतदानाचा हक्क बजावणे आवश्यक असल्याचे त्यांनी सांगितले. यानंतर उपस्थित शिक्षक–शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थ्यांना प्रा. अशोक कंठाळे यांनी 'मतदार जनजागृती' प्रतिज्ञा दिली. ङ्गयानंतर एन.एस.एस. विभागाच्या विद्यार्थ्यांनी मंडणगड बस स्टॅन्ड व शहरामध्ये मतदान जनजागृती या विषयावर पथनाटय सादर करुन मतदान जनजागृती केली. ङ्ग शेवटी उपस्थित सर्व मान्यवरांचे आभार डॉ. महेश कुलकर्णी यांनी मानले.

# बिडकरांची लागणार पुन्हा सभागृह नेतेपदी वर्णी! महापौर, स्थायीसह इतर अध्यक्षपदासाठीही चुरस वाढली

पुणे : अनुभवाचा विचार करताना अपेक्षेनुसार नगरसेवक गणेश बिडकर यांच्या गळयात महापालिकेच्या सभागृह नेत्याची माळ पडणार आहे. पक्षाच्या महापालिकेच्या गटनेतेपदी बिडकर यांची प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण यांनी नियुक्ती केली आहे. आता भाजपमध्ये महापौर, स्थायी समिती, शहर सुधारणा समितीसह इतर विषय समितींच्या अध्यक्षपदासाठी चुरस निर्माण झाली आहे.

महापालिका निवडणुकीत भाजपचे ११९ नगरसेवक निवडून आले आहेत. त्यामुळे एक हाती बहुमत भाजपकडे आहे. यामध्ये बिडकर हे सर्वांत अनुभवी नगरसेवक असुन, ते पाचव्यांदा महापिलकेत दिसणार आहेत. यापुर्वी त्यांनी सभागृह नेतेपद सांभाळले आहे. तसेच शहर सुधारणा समिती आणि स्थायी समितीचे अध्यक्षपदही त्यांनी सांभाळले आहे. त्या अनुभवाच्या जोरावर त्यांना पुन्हा संधी देण्यात आल्याची चर्चा आहे.

निवडून आलेल्या भाजपच्या ११९ नगरसेवकांनी एकत्र येत 'पुणे महापालिका भारतीय जनता पार्टी गट' स्थापन करण्याचा ठराव एकमताने मंजूर केला आहे. या




संदर्भातील पत्र भाजप महाराष्ट्र प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण यांच्या स्वाक्षरीने पुणे महापालिका आयुक्तांना पाठवण्यात आले आहे.

२०१७ साली मध्ये झालेल्या महापालिका निवडणुकी भाजपची सत्ता आली. त्यावेळी भापचे नगरसेवक श्रीनाथ भिमाले यांना अडीच वर्षे सभागृह नेते पदाची संधी देण्यात आली होती. त्यानंतर सध्याचे शहराध्यक्ष धीरज घाटे यांना सभागृह नेते पदी एक वर्ष संधी मिळाली. यानंतर महापालिका निवडणुका आणि भविष्यातील महापालिकेचे मोठे प्रकल्प पूर्ण करण्यासाठी भाजपने घाटे यांच्याकडे सभागृह नेते पद काढून बिडकर यांना पद दिले होते. पुढील दीड वर्षे बिडकर यांनी सभागृह नेते पद सांभाळे. या काळात नदी सुधार प्रकल्प, समान पाणीपुरवठा योजना, अटल बिहारी वैद्यकीय महाविद्यालय यांसारख्या योजनांना मंजुरी मिळाली. नुकतीच पुणे महापालिकेची झालेली निवडणूक बिडकर यांच्या नेतृत्वाखाली लढविण्यात आली. त्यामुळे बिडकर यांना पुन्हा संधी दिली.

भाजपमध्ये इतर पदांसाठी होणार चुरस !

सत्ताधारी भाजपने बिडकर यांची पक्षाचा गटनेता म्हणून निवड करून सभागृह नेते पदावर त्यांची वर्णी लावली आहे. आता इतर पदांसाठी भाजपमध्ये कमालीची स्पर्धा निर्माण झाली आहे. यामध्ये महापौर पदासाठी ज्येष्ठ महीला नगरसेविकांमध्ये चढाअओढ सुरु झाली आहे. तसेच स्थायी समिती ही सर्वांत महत्वाची समिती मानली जाते, या समितीच्या अध्यक्षपदावर भिमाले हे दावा सांगण्याची शक्यता निर्माण झाली आहे. त्याचप्रमाणे भाजपमध्ये तीन किंवा त्यापेक्षा अधिकवेळा निवडुन आलेल्या नगरसेवकांना न्याय मिळणे गरजेचे आहे. स्थायी समितीखालोखाल शहर सुधारणा समिती, महिला बाल कल्याण समिती, विधी समिती आदी विषय समिती देखील महत्वाच्या असुन, या समितींवर वर्णी लागावी, तसेच त्या समितीचे अध्यक्षपद मिळावे यासाठी नगरसेवक , नगरसेविकांकडून प्रयत्न सुरु झाले आहेत.



शिवसेना (शिंदे), शिवसेना (उबाठा), आय काँग्रेस, शेकाप, आरपीआय महा आघाडीचे नागोठणे जिल्हा परिषद गट उमेदवार सुमित काते, नागोठणे पंचायत समिती गण उमेदवार अंजली दुर्गावले यांची प्रचार रॅली निघाली तो क्षण.(छाया-: नारायण म्हात्रे सहसंपादक)

# मानवबिबट संघर्ष रोखण्यासाठी जुन्नर वनविभागाकडून उपक्रम; आपत्तकालीन दलास विशेष प्रशिक्षण

पुणे : पुणे जिल्ह्यात वाढत्या मानव-बिबट संघर्षाच्या पार्श्वभूमीवर जुन्नर वनविभागाच्या वतीने आपत्तकालीन प्रतिसाद दलासाठी विशेष प्रशिक्षण कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. घोडेगाव येथे २७ जानेवारी रोजी हे प्रशिक्षण यशस्वीरीत्या पार पडले. पुणे जिल्ह्यातील आंबेगाव, जुन्नर, शिरूर व खेड तालुक्यांतील एकूण २३३ गावांना जून २०२४ मध्ये बिबट हल्ल्यांच्या वाढत्या घटनांमुळे ''आपत्ती क्षेत्र'' म्हणून घोषित करण्यात आले आहे.

डेहराडून येथील भारतीय वन्यजीव संस्थेने केलेल्या अभ्यासानुसार, जुन्नरसह आसपासच्या भागात प्रति १०० चौरस किलोमीटर क्षेत्रात सहा ते सात बिबट्यांची घनता आढळून आली आहे. या पार्श्वभूमीवर बिबट हल्ल्यांचा धोका कमी करणे, तत्पर प्रतिसाद देणे, मदत व बचाव कार्य अधिक प्रभावी करणे यासाठी हे प्रशिक्षण आयोजित करण्यात आले.आशिष ठाकरे (वनसंरक्षक, पुणे) यांच्या संकल्पनेतून आणि उप वनसंरक्षक प्रशांत खाडे यांच्या मार्गदर्शनाखाली या प्रशिक्षणाची सुरुवात करण्यात आली. जुन्नर वनविभागाचे बहुतांश क्षेत्र डोंगराळ असून घोड व कुकडी प्रकल्पांतर्गत डिंभे, माणिकडोह, पिंपळगाव जोगा, वडज, चिल्हेवाडी, चासकमान अशा धरणांमुळे सिंचन सुविधा वाढल्या आहेत. परिणामी ऊस, केळी, द्राक्ष, डाळिंब यांसारख्या बागायती पिकांचे क्षेत्र वाढले. या पिकांमुळे बिबट्यांना लपण्यासाठी अनुकूल अधिवास व भक्ष्य सहज उपलब्ध होत आहे.

या प्रशिक्षणात जुन्नर, ओतूर, मंचर, घोडेगाव, खेड, चाकण व शिरूर वनपरिक्षेत्रातील आपत्तकालीन प्रतिसाद दलाचे ५१ सदस्य तसेच वनविभागाचे २८ क्षेत्रीय कर्मचारी सहभागी झाले. रेस्क्यू चॅरिटेबल ट्रस्ट, पुणे येथील तज्ज्ञांकडून प्रात्यक्षिकांद्वारे प्रशिक्षण देण्यात आले. कॅमेरा ड्रोनच्या वापराचे प्रात्यक्षिक रेस्क्यू चॅरिटेबल ट्रस्टचे नचिकेत उत्पात व किरण रहाळकर यांनी बिबट्याचा शोध व नियंत्रण, माग काढणे, पिंजरे लावणे, ट्रॅप कॅमेरे व ड्रोनचा वापर याबाबत मार्गदर्शन केले. तसेच नचिकेत अवधानी आणि श्रेयस कांबळे यांनी अंधार, ऊसशेती व दाट झाडीत शोध सुलभ करण्यासाठी थर्मल कॅमेरा ड्रोनच्या वापराचे प्रात्यक्षिक दाखवले.

प्रतिबंधात्मक उपाययोजनाबाबत मार्गदर्शन

बिबट हल्ल्याच्या प्रसंगी आपत्तकालीन प्रतिसाद दलाची भूमिका, घटनास्थळी तात्काळ पोहोचणे, वनविभाग, पोलिस व आरोग्य विभागाशी समन्वय, नागरिकांची सुरक्षितता, जखमींना वैद्यकीय मदत, जनजागृती व प्रतिबंधात्मक उपाययोजना याबाबत सविस्तर मार्गदर्शन करण्यात आले. प्रशिक्षण कार्यक्रमाचे प्रास्ताविक सहाय्यक वनसंरक्षक अमृत शिंदे यांनी केले

# लोकरंग

१ साप्ताहिक संवाद ङ्गभारताला जागतिक व्यापाराची खुली संधीङ्गतब्बल दीड दशकाहून सुरु असलेल्या वाटाघाटींना यश येऊन भारत आणि युरोपीय व्यापार संघामध्ये कालच ऐतिहासिक व्यापार करार संपन्न झालेला आहे. हा करार भारताने आजवर केलेल्या द्विपक्षीय व्यापार करारामध्ये  करार मानला जात आहे. या करारामुळे इयू मध्ये भारताच्या ९९ टक्के वस्तूवरील करभार कमी होणार असून इयू च्या ९७ टक्के वस्तुंना भारतात मुक्तदार खुले होणार आहे. याच अनुषंगाने अर्थतज्ज्ञ शशांक गुळगुळे यांच्याशी आजचा साप्ताहिक संवाद. ङ्ग१ भारत आणि युरोपीय महासंघात संपन्न झालेल्या या ऐतिहासिक कराराचे महत्व काय आहे?ङ्गदोन्ही देशांतील या करारामुळे युरोपीय निर्यातदारांच्या वार्षिक शुल्कात ४ अब्ज युरोची कपात होणार आहे. या ऐतिहासिक करारामुळे सर्वात मोठी गोष्ट म्हणजे भारत आणि युरोप मधील लाखो लोकांना रोजगाराच्या संधी निर्माण होणार आहेत. २०२४-२५ या आर्थिक वर्षात भारत आणि इयू मधील वस्तूंचा एकूण व्यापार सुमारे १३६ अब्ज डॉलर इतका होता त्यात आता वाढ  होईल. दोन्ही बाजूनी प्रथमच सुरक्षा आणि संरक्षण भागीदारी केली आहे. ङ्ग२या कराराचा प्रत्यक्ष लाभ कोण कोणत्या क्षेत्रांना होणार आहे?ङ्गया ऐतिहासिक कराराचा सर्वात मोठा लाभ हा भारतीय कृषी क्षेत्राला होणार आहे. प्रक्रिया केलेले अन्न,चहा,कोफी,मांस,मसाले या उत्पादनासाठी आता इयू चे मुक्त द्वार खुले झाले आहे. कपडे,चामड्याच्या वस्तू,पादत्राणे,दागिनेआणि खेळण्यावरील शुल्क रद्द होणार आहे. डिझेल,इलेक्ट्रॉनिक्स,ईटीएफ,टेक्स्टाईल,कम्प्युटर,पोलाद आणि लोखंड उद्योगाला चालना मिळणार आहे. सध्या ४ ते २६ टक्क्यापर्यंत शुल्कआकारानी होणारी ३३ अब्ज डॉलर्सची निर्यात शुल्कमुक्त होणार आहे. इयूतील तंत्राधारेत  उत्पादने स्वस्त होऊन भारतीय ग्राहकांना लाभ होईल. वाईन,बिअर आणि मद्यावरही कर कपात होणार आहे . ङ्ग३या कराराचा भारतीय उद्योगांना प्रत्यक्ष फायदा कसा होणार आहे?ङ्गया करारान्वये भारतातील ९९ टक्क्याहून अधिक निर्यातीला इयू बाजारपेठांमध्ये प्रवेश मिळणार आहे. एमएसएमी क्षेत्राला उद्योगाच्या नव्या संधी उपलब्ध होणार आहेत. वस्त्रोद्योग,चर्मोद्योग,सागरी उत्पादने,रत्ने आणि दागिने यासारख्या श्रमप्रधान क्षेत्रातील ३३ अब्ज डॉलर्सच्या निर्यातीला एफटीए अंतर्गत थेट प्रवेश मिळणार आहे. वाहन उद्योगासाठी कोटा आधारित काळजीपूर्वक आखलेले धोरण असणार आहे.मेक इन इंडिया अंतरंगात भारतातून उद्योग आणि रोजगाराच्या असंख्य संधी उपलब्ध होणार आहेत. कुशल आणि अकुशल कामगारांना जागतिक स्तरावर संधी मिळणार आहेत.ङ्ग२ चला पर्यटनाला ङ्गवाकी वुड्सङ्गनागपूर हे मोठ्या संख्येने पर्यटन स्थळांचे घर आहे, त्यातील प्रत्येक तुम्हाला एक अनोखा अनुभव आणि स्वादिष्ट खाद्यपदार्थ देण्यासाठी उभे आहे.वाकी वुड्स हे एक चित्तथरारक नैसर्गिक आकर्षण आहे जे नागपुरातून जवळपास ३० किलोमीटरचा प्रवास करून इतर दिशेने पोहोचता येते. पिकनिकला घालवलेल्या एका दिवसासाठी एक आकर्षक नैसर्गिक सेटिंग देण्याव्यतिरिक्त, हिरव्यागार हिरव्या भाज्या तुम्हाला मजा आणि मनोरंजनासाठी विविध प्रकारच्या संधी उपलब्ध करून देतात. तुम्हाला हे लक्षात येईल की या ''जंगलात'' राहणे हे आधुनिकता आणि वाळवंटाचे आदर्श मिश्रण आहे कारण तुम्ही वीज आणि टेलिफोन यांसारख्या आधुनिक सुविधांनी सुसज्ज असलेल्या छान सजवलेल्या तंबूंमध्ये राहाल.नौकाविहार, धनुर्विद्या, गिर्यारोहण आणि वन्यजीव छायाचित्रण हे वाकीच्या पक्षी अभयारण्यांमध्ये उपलब्ध असलेले काही उपक्रम आहेत. वाकी वुड्स ढाब्याला भेट द्या, जिथे तुम्ही मेजवानी करू शकतातुम्ही जंगलात असताना तोंडाला पाणी आणणारे पदार्थ. नागपूरजवळील या ठिकाणी तुम्ही अवश्य भेट द्या.ङ्ग३ क्रीडांगण





ङ्गमुंबई ओपन महिला टेनिस स्पर्धेत महाराष्ट्राची अव्वल मानांकित वैष्णवी आडकरचे कौशल्य पणाला ङ्गमहाराष्ट्र राज्य लॉन टेनिस संघटनेच्या वतीने आयोजित एल अँड टी मुंबई ओपन डब्ल्यूटीए १लाख २५हजार डॉलर महिला टेनिस स्पर्धेत महाराष्ट्राची अव्वल मानांकित खेळाडू वैष्णवी आडकर हिला मुख्य ड्रॉ मध्ये वाईल्ड कार्ड द्वारे थेट प्रवेश देण्यात आला असून घरच्या मैदानावर आपले कौशल्य पणाला लावणार आहे.स्पर्धेच्या पत्रात फेरीचे सामने ३१ जानेवारी व १ फेब्रुवारी रोजी होणार असून २ ते ८ फेब्रुवारी २०२६ या कालावधीत मुख्य ड्रॉ फेरीचे सामने रंगणार आहेत.ङ्गङ्ग२१ वर्षीय वैष्णवी आडकर हिने राज्यातील अव्वल मानांकित खेळाडू असून तिने लक्षवेधी कामगिरी केली आहे. २०२४ मध्ये वैष्णवी हिने १५हजार डॉलर महिला आयटीएफ स्पर्धेत आपले पहिले वाहिले विजेतेपद पटकावले होते. याशिवाय गतवर्षी जर्मनी येथे पार पडलेल्या जागतिक विद्यापीठ टेनिस स्पर्धेत तिने कांस्य पदक पटकावले होते. अशी कामगिरी करणारी पहिली भारतीय महिला टेनिस पटू ठरली होती.आगामी स्पर्धेत वैष्णवी सर्व्हिस व बेस लाईन खेळाकडे अधिक लक्ष देणार आहे. या स्पर्धेत क्रमवारीत अव्वल स्थानी असलेल्या खेळाडूंचा खेळ जवळून पाहण्याची व त्यानुसार आपल्या खेळात अधिक सुधारणा करण्यासाठी प्रयत्न करणार आहे.



संकलन संयोजन
सुबोध रणशेवरे
संपर्क -९८३३१४६३५६
इमेल -
subodh.ranshevre
@rediffmail.com

या जागेसाठी
जाहिरात
घेणे आहे

दैनिक
# सूर्योदय
रविवार ०१ फेब्रुवारी २०२६



या जागेसाठी
जाहिरात
घेणे आहे

## चिंचघरी प्राथमिक शाळेचा वार्षिक पारितोषिक वितरण समारंभ उत्साहात संपन्न



उपसंपादक प्रदीप पवार.

सहयाद्रि शिक्षण संस्थेची प्राथमिक शाळा खेर्डी- चिंचघरी (सती) या विद्यालयाचा वार्षिक पारितोषिक वितरण समारंभ उत्साहात संपन्न झाला. कार्यक्रमाचे अध्यक्ष शाळेचे मुख्याध्यापक व उपस्थित शिक्षक वृंदांच्या शुभहस्ते सहयाद्रि शिक्षण संस्थेचे संस्थापक स्व. गोविंदरावजी निकम साहेब यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. बौद्धिक स्पर्धा, क्रीडा स्पर्धा, फनी गेम्स, संस्थांतर्गत स्पर्धा, अशा विविध स्पर्धामध्ये प्राविण्य मिळविलेल्या विद्यार्थ्यांना प्रशस्तिपत्रक, भेटवस्तू देवून मान्यवरांच्या हस्ते गौरविण्यात आले. यावेळी कार्यक्रमाचे प्रास्ताविक मुख्याध्यापक सकपाळ यांनी केले व सर्व विद्यार्थ्यांना भविष्यात अधिक परिश्रम करून उज्वल यश संपादन करण्याचा संदेश दिला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन शिक्षिका विनया नटे व अर्चना देशमुख यांनी केले. कार्यक्रमासाठी शाळेचे मुख्याध्यापक अरविंद सकपाळ , मनीषा कांबळी, रश्मी राजेशिर्के , संदेश सावंत, अपूर्वा शिंदे, अर्चना देशमुख, ज्योती चाळके, रूपाली खरात, वर्षा सकपाळ, शितल पाटील, स्वरा भुरण, विजया मौजे, विनोद उदेग, एकनाथ चाळके यांनी विशेष मेहनत घेतली .

## भरधाव ईक्को कार एक्टीवा दुचाकीवर आदळुन १ ठार, रिक्क्षालाही धडक दिल्याने रिक्क्षाचालक गंभीररित्या जख्मी

पनवेल प्रतिनिधी-सुनील जाधव

नवी मुबंई पनवेल रेल्वे परिसरात आज सकाळी ८.०० वा. नर्मदा कॉम्पलॅक्स समोर भरधाव वेगाने आलेल्या ईक्को कारने रस्त्यावरुन जाणा-या एक्टिवा दुचाकी स्वाराला पाठीमागुन जोरदार धडक दिल्याने दुचाकी स्वार जागीच ठार झाला तर रिक्क्षालाही धडक दिल्याने रिक्क्षा चालक गंभीररित्या जख्मी झाल्याने तातडीने त्याला उपचारा साठी जवळच्या हॉस्पिटल मधे भर्ती करण्यांत आले असुन ईक्को कार मालकाने घटनास्थळा पांसुन पळ काढला असे समजते.अपघाताची माहीती मिळताच पनवेल शहर पोलिस ठाण्यातील पोलिस अधिकारी तातडीने घटना स्थळी दाखल होवुन झालेल्या घटनेचा तपास करीत आहे.



## मोरवणे बुद्रुक येथे भव्य ओव्हर आर्म क्रिकेट स्पर्धेचे आयोजन

चिपळूण मोरवणे बुद्रुक श्रीराम विकास मंडळ, रजि. मोरवणे बुद्रुक यांच्या वतीने सालाबादप्रमाणे याही वर्षी भव्य ओव्हर आर्म क्रिकेट स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. या स्पर्धेचे हे आठवे वर्ष असून स्पर्धा दिनांक १ व २ फेब्रुवारी २०२६ रोजी संपन्न होणार झाले आहे.या निमित्ताने सर्व शहरवासी, ग्रामस्थ व मंडळाचे सदस्य यांनी कार्यक्रमस्थळी उपस्थित राहून सामन्यांची शोभा वाढवावी, असे आवाहन आयोजकांच्या वतीने करण्यात आले आहे.या स्पर्धेचे आयोजन श्रीराम विकास मंडळाचे



आहेत.ङ्गसदर क्रिकेट स्पर्धा मोरवणे बुद्रुक, ढगळेवाडी, ता. चिपळूण, जि. रत्नागिरी येथे आयोजित करण्यात येणार आहे. या स्पर्धेत परिसरातील अनेक संघ सहभागी होणार असून क्रीडाप्रेमींमध्ये उत्साहाचे वातावरण निर्माण पदाधिकारी श्री. सुशील अनिलराव शिंदे (सेक्रेटरी),श्री. किरण सुधीरराव शिंदे (खजिनदार),ङ्गश्री. रोहन चंद्रकांतराव शिंदे (सदस्य)ङ्गयांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात येत आहेत.

## उकरूळ पंचायत समिती गणात मनसेचे प्रियांका जितेंद्र पाटील यांना मतदारांचा उत्स्फूर्त प्रतिसाद

कर्जत:जयेश जाधव

कर्जत तालुक्यातील जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणुकांची रणधुमाळी आता शिगेला पोहोचली असून मनसेने देखील आता स्वबळावर निवडणूक लढवीत आहे ङ्ग२२ उकरूळ पंचायत समिती गणात मनसेचे इंजिन सुसाट धावत असून उमेदवार प्रियांका जितेंद्र पाटील यांच्या प्रचाराला मतदारांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत आहे ङ्गउकरुळ पंचायत समिती गणात डिकसळ,उकरूळ, गारपोली किरवली मालवाडी येथे मनसे जिल्हाध्यक्ष जितेंद्र पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली विद्यार्थी सेना अध्यक्ष प्रसन्न बनसोडे, अक्षय महाले, राजेश साळुंखे यांनी यांच्या नेतृत्वाखाली प्रचारात मोठ्या संख्येने कार्यकर्ते व महिला सहभागी होऊन प्रचारात आघाडी घेतली आहे सध्या तरी मनसेचे सुशिक्षित उमेदवारांकडे महिला मतदारांकडून उत्तम प्रतिसाद मिळत आहे ङ्गउकरुळ पंचायत समिती गणात सुशिक्षित व सुसंस्कृत उमेदवार प्रियांका जितेंद्र पाटील यांचे घरोघरी जाऊन शिस्तबद्ध पद्धतीने प्रचार महिला मतदारांकडून उत्तम प्रतिसाद मिळत असल्याचे चित्र दिसून येत आहे.



## कंत्राटी कामगारांनी सुरक्षित काम करूनच कंपनीचे नावलौकिक वाढवले – चंद्रकांत अडसुळे

सहसंपादक-:
नारायण म्हात्रे

नागोठणे येथील रिलायन्स कंपनीमध्ये रिलायन्स उद्योग समुहाने दिलेले सुरक्षेचे व स्वच्छतेचे नियम पाळून कंपनीचा उत्पादन व नितीमुल्य जपून रिलायन्स कंपनीचा नावलौकिक वाढवल्याचे त्यांनी आवर्जून सांगितले, ते पिपी प्लांटमध्ये काम करणारे अनंता पाटील यांच्या सेवानिवृत्तपर कार्यक्रमात बोलत होते. अनंता पाटील यांनी गेली तीस वर्षे कंपनीची इमानेइतबारे सेवा केली या सन्मानाने मी भारावून गेलो असल्याची भावना अनंत पाटील यांनी व्यक्त केली. सत्कार समारंभाप्रसंगी चंद्रकांत अडसूळे, मॅकेनिकल इंजिनिअर अश्वीन चवरकर, अशोक पवार, रोटोस्टाट कंपनीचे इन्चार्ज गगन जैन, सुपरवाइजर/दै.सूर्योदय सहसंपादक नारायण म्हात्रे यांनी आपले अमूल्य विचार व्यक्त केले.ङ्ग सदर कार्यक्रमास उपस्थित रिलायन्स इंस्टुमेंटस विभागाचे अधिकारी चंद्रकांत अडसुळे, मॅकेनिकल इंजिनिअर अश्वीन चवरकर, अशोक पवार, दिपक पालवे, शरद गोरे, मधुकर जवके तसेच रोटोस्टाट कामगार वर्ग किशोर शिर्के, दिपक कोकाटे, संदिप मोकल, नरेंद्र पाटील, मच्छिंद्र गवंडकर, समिर भुरे, सुजित कापसे, मच्छिंद्र म्हात्रे, मंगेश गडगे, राकेश म्हात्रे, सुहाग भोईर, नरेश ताडकर, महेंद्र कदम, भास्कर कुथे, सनावुल हक, सुरज गुप्ता, सद्दाम हुसेन, मैनुद्दीन अन्सारी, सहीम अन्सारी आदी कामगार वर्ग व रिलायन्सचे अधिकारी उपस्थित होते.



भरत सरपरे (संपादक कोकण आवृत्ती), संपर्क : ९०४९८११०६५ मु. भिंगळोली पो.ता.मंडणगड जि.रत्नागिरी, कोकण विभागीय कार्यालय पत्ता : निलेश महादेव आखाडे ०६ र.न.प.वसाहत नाचणे रोड रत्नागिरी.४१५६१२

हे पत्र मालक, प्रकाशक संपादक गंगाधर सिताराम काळकुटे यांनी माऊली ऑफसेट प्रिंटर, एम.एस.ई.बी. ऑफिसजवळ, माळीवेस बीड- ४३११२२ येथे छापून दैनिक महाराष्ट्र सूर्योदय, हॉटेल रायगड, जिल्हाधिकारी ऑफीससमोर, नगर रोड, बीड ४३११२२ येथे प्रकाशित केले. मुख्य कार्यालयः जिल्हाधिकारी कार्यालया समोर, नगर रोड, बीड मुख्य संपादकः गंगाधर काळकुटे मो. ९८५४८९८९८९ , अंकामधील छापून आलेल्या मजकुराशी संपादक सहमत असतीलच असे नाही. (वाद बीड न्यायकक्षेत )